# प्रेसनोट दि.२५/०४/२०२५

सापरोंडे ग्राम पंचायत पो.कुडूस, ता.वाडा, जि.पालघर येथील सरपंच यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना ताब्यात घेतले.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | वाडा पो.स्टे. जि.पालघर |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | आरोपी लोकसेविका सरपंच सौ शोभा सुनिल गवारी,वय ३६ वर्षे, राहणार–हेमंत सुभाष भोईर चौक,सापरोंडे ग्राम पंचायतीच्या मागे,पो.कुडुस,ता.वाडा,जि.पालघर |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | रु. २०,०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | तडजोडी अंती १९,०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार श्री.ह्रतीक नरेश पाटील हे अफजल सिराजउददीन खान शासकीय ठेकेदार यांच्याकडे काम करतात. श्री.अफजल सिराजउददीन खान यांच्या नावावर शासनाकडुन ग्रुप ग्रामपंचायत सापरोंडे, मागाठाणे या गांवी ग्राम पंचायत कार्यालय विस्तारीकरण करण्याचे काम टेंडर पध्दतीने देण्यात आलेले असुन सदरचे काम तक्रारदार पाटील यांचे देखरेखी खाली पुर्ण केले जात आहे. ग्रुप ग्रामपंचायत सापरोंडे, मागाठाणे येथील चंद्रकांत शंकर भोईर यांचे घर ते बारकु भोईर यांच्या घरापर्यंत आंबेडकरनगर, सापरोंडे येथे पेवरब्लॉक बसविण्याचे काम सुरू करणे करिता लोकसेविका यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/–रू. लाचेची रक्कमेची मागणी केली असल्याबाबत दिनांक २४/०४/२०२५रोजी लेखी तक्रार दिली होती.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २४/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या लाचेच्या पडताळणीत वरील नमुद आरोपी लोकसेविका यांनी तक्रारदार यांच्याकडे २ टक्क्यांप्रमाणे २०,०००/– रू. लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले.त्यानंतर दिनांक २५/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळापूर्व सापळा पंचनामा कारवाईत लोकसेविका यांनी तक्रारदार यांचेकडून तडजोडीअंती १९००० लाचेची रक्कम स्विकार करतांना आलोसे यांना त्यांचे राहते घरी हेमंत सुभाष भोईर चौक,सापरोंडे ग्रामपंचायतीच्या मागे,पो.कुडुस ता.वाडा जि.पालघर येथे रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.शिवराज पाटील सो.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिति असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३)ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६)दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक

Santosh
PI